'साप्ताहिक शब्दरुतू'चे वार्षिक वर्गणीदार होण्यसाठी क्यूआर कोडवर वार्षिक किंवा मासिक योजनांचे पेमेंट करून मो. ९०११२०१४१४ या व्हाट्सॲप नंबरवर स्क्रिनशॉट व आपला पूर्ण पत्ता पाठवावा.
**वार्षिक वर्गणी : १८० । मासिक वर्गणी : १४**

# शब्दरुतू

पोस्टल परवाना नं. SRP/136/2023-2026 संपर्क : मो. ९०११२०१४१४
**कार्यकारी संपादक : सुमीत लांडे, मुंबई** Email ID : shabdarutu@gmail.com


### तुकाराम मुंढेंची पुन्हा बदली; २३ वेळा बदली




**मुंबई :** राज्यातील कर्तबगार आयएएस अधिकारी तुकाराम मुंढेंची पुन्हा एकदा बदली करण्यात आली आहे. २० वर्षांच्या सेवेत मुंढेंची ही २३ वी बदली करण्यात आली आहे. नव्याने बदली करण्यात आल्यानंतर आता मुंढेंची दिव्यांग कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई येथे नियुक्ती करण्यात आली आहे. मुंढे यांच्यासह राज्यातील पाच वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांच्याही बदल्या करण्यात आली आहे.

* वर्ष २ रे * अंक ४५ वा * रविवार दि. १० ऑगस्ट २०२५ (Decl.Regd.No. SR/MAG/11/2021) RNI.NO.MAHMAR/2021/84232 पाने ४ * किंमत ४ रु. साप्ताहिक (Weekly)

**नवी कोरी पुस्तकं**



**साहित्यगंध**
: लेखकाचे नाव :
**डॉ. सतीश कामत**
किंमत रु. : ४८०/-
: प्रकाशन :
**शब्दालय प्रकाशन**



**रंग्या**
: लेखकाचे नाव :
**आनंद वाघ**
किंमत रु. : २५०/-
: प्रकाशन :
**शब्दालय प्रकाशन**

# अमेरिकेकडून भारतावर ५० टक्के टॅरिफ

## रशियाकडून तेल खरेदी सुरु ठेवल्याने भारतावर कारवाई

**नवी दिल्ली :** अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर २५ टक्के अतिरिक्त टॅरिफ लादलं आहे. अमेरिकेनं आता भारतावर लादलेलं टॅरिफ आता ५० टक्क्यांवर पोहोचलं आहे. रशियाकडून तेल खरेदी सुरु ठेवल्यानं भारतावर ही कारवाई केल्याचं ट्रम्प यांनी म्हटलं आहे.




ट्रम्प यांच्या या निर्णयाला भारताच्या विदेश मंत्रालयानं उत्तर दिलं आहे. अमेरिका भारताला रशियाकडून तेल खरेदी करत असल्यानं लक्ष्य करत असल्याचं विदेश मंत्रालयानं म्हटलंय. विदेश मंत्रालयासोबत लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी देखील डोनाल्ड ट्रम्प ब्लॅकमेल करत असल्याचं म्हटलंय. अमेरिकेने अलिकडच्या काळात रशियाकडून तेल खरेदी करत असल्यानं भारताला लक्ष्य केलं आहे. विदेश मंत्रालयानं म्हटलं की आम्ही या मुद्यांवर आमची भूमिका आधीच स्पष्ट केली आहे, ज्यामध्ये आमची आयात बाजारपेठेच्या घटकांवर आधारित आहे आणि भारतातील १.४ अब्ज लोकांची ऊर्जा सुरक्षा सुनिश्चित करण्याच्या एकूण उद्देशाने केली जाते. विदेश मंत्रालयाकडून याबाबत इतर देशांचा दाखला देखील अमेरिकेला देण्यात आला **(पान २ वर)**

### भारतीय सामान, मेरा स्वाभिमान मोहिम सुरु

ट्रम्प प्रशासनाने भारतावर व्यापारिक शुल्क आकारण्याची घोषणा केली आहे. त्यामुळे अमेरिकेसोबत व्यापार करताना भारतीय व्यापाऱ्यांची कोंडी होणार आहे. त्यामुळे या व्यापारांच्या भारतातील अत्यंत मोठ्या संघटनेने अमेरिकेला सडेतोड उत्तर देण्यासाठी भारतीय सामान, मेरा स्वाभिमान, ही मोहीम सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. या अंतर्गत कॅटशी देशभरात जोडलेल्या ४० हजार व्यापारी संघटना आणि ८ कोटी व्यापारांच्या माध्यमातून स्वदेशी वस्तूंच्या खरेदी-विक्रीसाठीची खास मोहीम राबवली जाणार आहे.

### चीन भारताच्या बाजूनं

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफ धोरणाचा पाकिस्तानचा सच्चा मित्र म्हणून ओळखला जाणाऱ्या चीनकडून विरोध करण्यात आला आहे. अमेरिकेने भारतावर अतिरिक्त टॅरिफ लावल्यानंतर चीनची भूमिका समोर आली. टॅरिफ धोरणाच्या दुरूपयोगाला स्पष्ट विरोध असल्याची प्रतिक्रिया चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते गुओ जियाकून यांनी दिली. दरम्यान चीनच्या या भूमिकेवर अमेरिका काय प्रतिक्रिया देणार हे पाहणं महत्त्वाचं ठरेल.

### पुतिन लवकरच भारत दौऱ्यावर-

रशियाचे अध्यक्ष पुतिन लवकरच भारत दौऱ्यावर येणार आहेत. भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनी याबद्दल माहिती दिली आहे. पुतिन यांचा हा दौरा २०२५ च्या अखेरीस होण्याची शक्यता आहे. अमेरिकेने भारतावर टॅरिफ लावण्याचा निर्णय घेतल्यानंतर या दौऱ्याला अधिकच महत्त्व प्राप्त झाल्याची चर्चा आहे.

# लक्षात ठेवा देशाशी गद्दारी करत आहात

## काळ बदलेल, शिक्षा नक्की मिळेल : राहुल गांधींचा गर्भित इशारा

**नवी दिल्ली :** लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी तब्बल एक तास ११ मिनिटे प्रेझेंटेशन करत केंद्रीय निवडणूक आयोग आणि भाजपवर गंभीर आरोप केले आहेत. दोघांनी संगनमत करून मतचोरी करत असल्याचा गंभीर आरोप राहुल गांधी यांनी आपल्या प्रेझेंटेशनमधून केला. तुम्ही देशाशी गद्दारी करत आहात, काळ बदलेल तेव्हा तुम्हाला केलेल्या कृत्याची शिक्षा नक्की मिळेल, असा गर्भित इशारा राहुल गांधी यांनी दिला आहे. दरम्यान, काल (८ ऑगस्ट) दिलेल्या प्रेझेंटेशननंतर आजही राहुल गांधी यांनी आठ मिनिटांचा व्हिडिओ रिलीज करत पुन्हा एकदा भाजप आणि केंद्रीय निवडणूक आयोगावर हल्लाबोल केला. इतकेच नव्हे तर राहुल गांधी यांनी महाराष्ट्राच्या निवडणूक निकालानंतरच आम्हाला मतचोरीचा संशय आल्याचे म्हटले आहे. त्यानंतरच



आम्ही याबाबतीत काम सुरू केलं आणि मतचोरी समोर आणल्याचं राहुल गांधी यांनी म्हटलं आहे.

राहुल गांधी यांनी अशा देशभरात १०० ठिकाणी मतचोरी झाल्याचा दावा केला आहे. लोकसभा निवडणुकीत भाजपला १५ जागा कमी मिळाल्या असत्या, तरी मोदी पंतप्रधान झाले नसते आणि इंडिय आघाडीचे सरकार स्थापन झाले असते, असा दावाही राहुल गांधी यांनी केला आहे. मशीन रीडेबल मतदारयादी आयोग देत नसल्याने संशय बळावल्याचे ते म्हणाले.

राहुल यांनी कर्नाटकची मतदार यादी स्क्रीनवर दाखवली आणि **(पान २ वर)**

# इंडिया आघाडीच्या बैठकीत उद्धव ठाकरे शेवटच्या रांगेत

## तुमच्यापेक्षा एकेक खासदारवाले पक्ष बरे : शिवसेना-भाजपची टीका

**नवी दिल्ली :** काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या दिल्लीतील सुनहरी बाग रस्त्यावरील शासकीय निवासस्थानी 'इंडिया'तील पक्षनेत्यांसाठी स्नेहभोजनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी त्यांनी निवडणूक आयोगावरील आरोपांचे सादरीकरण पुन्हा करुन दाखवले. यावेळी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव



ठाकरे मागच्या रांगेत बसल्याने सत्ताधाऱ्यांनी टीकेची झोड उठवली आहे. **(पान २ वर)**

### संक्षिप्त

## एकाच पदावर शिंदे, फडणवीसांकडून नियुक्ती

**मुंबई ।** बेस्टच्या महाव्यवस्थापक पदावर नियुक्तीसाठी मुख्यमंत्री फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वेगवेगळे आदेश काढत वेगवेगळ्या व्यक्तींची नियुक्ती केल्याचा प्रकार समोर आलाय. दोन्ही नेत्यांमध्ये समन्वय नसल्यानं घडलेल्या या प्रकारामुळे प्रशासनात मात्र मोठा गोंधळ उडाला आहे. मुख्यमंत्र्यांचा की उपमुख्यमंत्र्यांचा ? कोणाचा आदेश पाळायचा असा प्रश्न प्रशासनाला पडलाय. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बेस्टच्या महाव्यवस्थापक पदासाठी वेगवेगळे आदेश काढले आहेत. बेस्टचे महाव्यवस्थापक श्रीनिवास हे नुकतेच निवृत्त झाले.

# प्रा. अविनाश सप्रे यांच्या पुस्तकास पुरस्कार

**सांगली :** महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या वतीने दिला जाणारा यंदाचा धों. वि. देशपांडे स्मृती पुरस्कार येथील सुप्रसिद्ध समीक्षक, लेखक व वक्ते प्रा. अविनाश सप्रे यांच्या स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरी या ग्रंथास घोषित झाला आहे. हा ग्रंथ मराठी साहित्याला कसदार पुस्तकांचे योगदान देणाऱ्या शब्दालय प्रकाशन या संस्थेने प्रकाशित केला आहे.




प्रा. सप्रे यांनी या ग्रंथात स्वातंत्र्योत्तर कादंबरी विश्वातील **(पान २ वर)**

# ५०० पेक्षा अधिक तरुणींशी संबंध अन् हजारावर क्लिप्स!

**पुणे :** माजी मंत्री एकनाथ खडसे यांचे जावई आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्ष रोहिणी खडसे यांचे पती डॉ. प्रांजल मनीष खेवलकर यांच्या मोबाईल आणि लॅपटॉपमध्ये हजाराहून अधिक अश्लिल क्लिप आढळून आल्या असून पाचशे पेक्षा जास्त तरुणींशी संबंध ठेवल्याचे दिसत आहेत.

यातील काही क्लिप



प्रांजल खेवलकर प्रकरण

अतिक्षय आक्षेपार्ह असून कदाचित संबंधीत तरुणींवर अत्याचार केल्याचे दिसून येत आहे. मात्र सध्यातरी तपास फक्त ड्रगशी संबंधीत प्रकरणात सुरु असल्याची माहिती पोलीस दलातील सुत्रांनी दिली. डॉ. खेवलकर हा २७ जुलै रोजी खराडी येथील स्टेबर्ड हॉटेलमध्ये ड्रग्ज आणि मद्य पार्टी करताना पोलिसांच्या जाळ्यात सापडला.

क्रिकेट सट्टा व्यापारी निखिल पोपटानी आणि इतर महिलांसह पार्टीमध्ये डॉ. खेवलकरचा **(पान २ वर)**

# निवडणूक अधिकाऱ्यांच्या मानधनात दुपटीने वाढ

**मुंबई :** केंद्रीय निवडणूक आयोगाने केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांच्या (बीएलओ) मानधनात दुपटीने वाढ केली आहे. २०१५ पासून बीएलओना ६ हजार रुपये मानधन मिळत होते. आता ते दुपटीने वाढवून १२ हजार रुपये करण्यात आले आहे. तर बीएलओ पर्यवेक्षकांचे मानधन १२ हजारांवरुन १८ हजार रुपयांपर्यंत वाढवले आहे. तसेच पहिल्यांदाच निवडणूक नोंदणी अधिकारी आणि सहाय्यक निवडणूक नोंदणी अधिकारी यांनाही मानधन देण्याचा निर्णय घेतला आहे, असे केंद्रीय निवडणूक आयोगाने जारी केलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे. निवडणूक नोंदणी अधिकाऱ्यांना ३० हजार रुपये आणि सहाय्यक निवडणूक नोंदणी अधिकाऱ्यांना २५ हजार रुपये मानधन दिले जाणार आहे. **(पान २ वर)**

# पुणे जिल्ह्यात तीन नव्या महापालिका होणार; अजित पवारांनी केली घोषणा

**पुणे :** उपमुख्यमंत्री आणि पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी आज (८ ऑगस्ट) पहाटेच्या सुमारास मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होणाऱ्या चाकण चौक आणि परिसराची पाहणी केली. पुणे-नाशिक आणि चाकण-शिक्रापूर मार्गावरील या चौकात वाहतूक कोंडी नित्याची असती. याचं चौकातून चाकण एमआयडीसीमध्ये कर्मचाऱ्यांना जावं लागतं. या एमआयडीसीमध्ये १५०० छोट्या-मोठ्या कंपन्या आहेत, त्यात साडे तीन लाख कर्मचारी काम करतात. त्यामुळं या परिसरात रोज लाखभर वाहनं ये-जा करतात. त्यामुळं या चौकातील कोंडी फोडण्याचं मोठं आव्हान सरकारसमोर असणार आहे. यावेळी चाकणला स्वतंत्र महानगरपालिका होणार असल्याचे सूतोवाच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले आहे. चाकणच्या वाहतूक कोंडीची पाहणी करताना त्यांनी हे वक्तव्य केले आहे सोबतच बारामतीची तुलना चाकण सोबत करू नका असे अजित पवार यांनी



म्हटलं आहे.

तुम्हाला आवडो किंवा न आवडो पण नजीकच्या काळात चाकण आणि या सर्व परिसरामध्ये महानगरपालिका करावी लागणार आहे, आणि महानगरपालिका केल्याशिवाय आपल्याला अधिकचा निधी आणि बाकीच्या ज्या काही गोष्टी आहेत जसे की रस्ता अंडरग्राउंड ड्रेनेज, अशा अनेक बाबी असतात, यामध्ये बँकांचे वर्ल्ड बँकचे पैसे आणता येतात, केंद्र सरकारचा निधी आणता येतो, या प्रकारे आपल्याला करावे लागेल. काहींना ते आवडेल काहींना आवडणार नाही. मात्र, काळानुसार निर्णय घ्यावे लागतात. मी देखील काम करताना पाहिले आहे, अनेक जिल्ह्यांमध्ये नव्या महापालिका आल्या, ठाणे महानगरपालिका एकटी होती, त्यानंतर मुंबई महानगरपालिका झाली. मीरा भाईंदर महानगरपालिका झाली, जिल्ह्यामध्ये उल्हासनगर महानगरपालिका झाली, तिथे पूर्वीपेक्षा आता वेगाचा विकास झाला आहे, वसई विरार महानगरपालिका झाली, त्या ठिकाणी सहा सात महानगरपालिका झाल्या. तसं आपल्या जिल्ह्यात पुणे, पिंपरी चिंचवड त्यानंतर वाकवस्ती, लोणी काळभोर, वाघोली, मांजरी या सर्व भागांमध्ये एक महानगरपालिका करावी लागेल, फुरसुंगी, उरुळी देवाची, तो सर्व परिसर एक महानगरपालिका नदी ओलांडून इकडे आलो पिंपरी चिंचवड मधनं तर बाकीच्या भागांमध्ये एक महानगरपालिका करावी लागेल आणि एक महानगरपालिका**(पान २ वर)**

### आयुक्तांना अजितदादांनी खडसावलं

एक गाडी थांबली की गाड्यांच्या रांगा लागतायेत. मग पिक टाईममध्ये काय अवस्था होत असेल, असं अजित पवार म्हणाले. तसेच अजित पावर पाहणी करत असताना चाकणच्या चौकात पिंपरी चिंचवड पोलिसांनी वाहनं रोखून धरली. त्यामुळं अजित पवारांनी पोलीस आयुक्त विनायकुमार चौबेंना खडसावले. ओ चौबे, हे बरोबर नाही. मूर्खासारखं ही वाहनं थांबवून कोंडी का केली आहे?, सगळी वाहतूक सुरु करा, असं अजित पवार म्हणाले आहेत. तसेच चाकण औद्योगिक क्षेत्रातील वाहतुककोंडीचा आढावा घेताना अजित पवारांनी आधिकाऱ्यांना रस्त्यांवरील खड्ड्यांचे फोटोही दाखवले.

# तीन दलित मुलींचा कोथरूड पोलीस ठाण्यात छळ

## पीएसआय कामठेचा विकृत स्पर्श, कॉन्स्टेबल शिंदेंनी कमरेत लाथा घातल्या : पोलिसांकडून मात्र इन्कार

**पुणे :** पुण्यातील कोथरुड पोलीस ठाण्यात तीन दलित समाजाच्या तरुणींचा छळ करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेनंतर एकच खळबळ उडाली होती. कोथरुड पोलीस ठाण्यातील वरच्या खोलीत आपला तब्बल चार तास छळ सुरु होता, असा आरोप पीएसआय कामठेचा विकृत स्पर्श, या तरुणींनी केला. यावेळी पोलिसांनी जातीवाचक शिवीगाळ आणि लैंगिक शेरेबाजी केल्याचे या तरुणींनी पोलिसांना दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे. यामध्ये पीडित तरुणींनी पीएसआय कामठे, कॉन्स्टेबल शिंदे, सायबर पोलीस सानप, पिवळ्या रंगाचं चेक्सचं शर्ट घातलेले एक पोलीस यांचा उल्लेख केला आहे. या सर्वांनी पोलीस ठाण्यात आपला छळ केल्याचा आरोप तरुणींनी केला. पोलिसांनी मात्र असे काही घडले नसले ते मनात आरोप फेटाळले आहेत. हे सर्व पोलीस कर्मचारी आणि निवृत्त पोलीस अधिकारी असलेले माझ्या मैत्रिणीचे सासरे कोथरुडमध्ये आमच्या फ्लॅटवर आले. त्यावेळी फ्लॅटमध्ये आम्ही दोघी मैत्रिणी होतो. त्यांनी घरात शिरताच झाडाझडती सुरु केली. त्यांनी आम्हाला दुपारी साडेतीन वाजता कोथरुड पोलीस ठाण्यात नेले. तिकडे



आम्हाला ७.३० वाजेपर्यंत पोलीस स्टेशनच्या वरच्या मजल्यावर बसवून ठेवण्यात आले होते. पोलिसांनी आम्हाला आमच्या विवाहीत मैत्रिणीचा पत्ता विचारुन मारायला सुरुवात केली. सुरुवातीला आम्ही काही सांगितलं नाही. पण जास्त मार बसल्यावर पोलिसांना आम्ही तिचा पत्ता सांगितला. यानंतर पोलिसांनी आम्हाला जातीवाचक शिवीगाळ आणि लैंगिक शेरेबाजी केल्याचे पीडित तरुणीने तक्रारीत म्हटले आहे. आमची चौकशी करणाऱ्या कॉन्स्टेबल शिंदे नावाच्या मॅडमनी माझ्या वैयक्तिक आयुष्याबाबत शेरेबाजी केली. एकट्या राहता, मोकाट सुटलाय. किती पोरांसोबत झोपते ? तुझ्या रुमवर पोरं झोपायला येतात का? तुझी आणि तुझ्या मैत्रिणीची ओढणी/स्टोल एकाच रंगाचा आहे. तुम्ही लेस्बियन दिसताय. तुम्हाला पाहूनच वाटतं की, तुम्ही एलबीजीटीक्यू कम्युनिटीच्या आहात, असे वारंवार बोलून सर्व पोलीस अधिकाऱ्यांनी माझा शाब्दिक लैंगिक छळ केल्याचे तरुणींनी सांगिते. तुझा बाप नाही, फक्त माय आहे. सोडून दिलंय का तुला? पगारातले पैसे घरी देतेस का? त्यांनी पण तुला वाऱ्यावरच सोडलं आहे का? म्हणूनच तू वाया गेलीस, कॉन्स्टेबल शिंदे यांनी माझ्या मोबाईलमधील फोटो पाहून, मस्त मजा करते, ऐष करते, अशी टिप्पणी केली. पोलीस वारंवार माझी जात विचारत होते, नाव सांगितलं की हसायचे. एकाने शिवी दिली की इतरजण हसायचे. पोलिसांनी माझ्या मोबाईलमधील पर्सनल चॅटही वाचले. माझ्या व्हॉईसनोट ऐकल्या. दोन मित्रांसोबतचे चॅट वाचून, या दोघांमधला तुझा बॉयफ्रेंड कोण? असेही पोलिसांनी विचारले. कोथरुड पोलीस ठाण्यात जवळपास चार तास माझा मानसिक आणि शारीरिक छळ करण्यात आला असा आरोप पीडित तरुणीने केला.

### रोहित पवाराकडून आंदोलन, सुजात आंबेडकर यांचा संताप

याप्रकरणात मुलींनी पुण्यातील काही सामजिक कार्यकर्त्यांची मदत घेऊन दाद मागण्याचा प्रयत्न केला. सुरुवातीला पोलिसांनी त्यांच्याकडे फार लक्ष दिले नाही. मात्र, रविवारी रात्री रोहित पवार, सुजात आंबेडकर, प्रशांत जगताप आणि अनेक सामाजिक कार्यकर्ते पुणे पोलीस आयुक्तालयाबाहेर ठिय्या देऊन बसले. रात्री साडेतीन वाजेपर्यंत या सगळ्यांची वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांशी चर्चा सुरु होती. तरीही पोलिसांनी याप्रकरणात गुन्हा दाखल करुन घेतलेला नाही. त्यामुळे वंचित बहुजन आघाडीचे नेते सुजात आंबेडकर यांनी संताप व्यक्त केला.

# कबुतरखाने बंद करण्याच्या निर्णयाला स्थगिती

## मुख्यमंत्र्यांनी जैन समाजाच्या दबावापुढे नमते घेतले : ठाकरे

**मुंबई :** मुंबई उच्च न्यायालयाने शहरातील कबुतरखाने बंद करण्याच्या दिलेल्या आदेशाला मंगळवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अंशतः स्थगिती दिली. मुंबईतील कबुतरखाने अचानक बंद करणे योग्य ठरणार नाही. त्यामुळे तुर्तास कबुतरांना नियंत्रित स्वरुपात खाद्य पुरवत राहावे, असे आदेश मुख्यमंत्र्यांनी मुंबई महानगरपालिकेला दिले होते. यानंतर विरोधकांनी महायुती सरकारवर टीकेची ओड उठवली आहे. सरकारने जैन समाजाच्या दबावापुढे नमते घेतल्याचा आरोप विरोधी पक्षांकडून करण्यात आला. भाजप राजकीय फायद्यासाठी जैन समाजाला खुश करत असल्याची टीका आमदार आदित्य ठाकरे यांनी केली.



तर राज्याचे मंत्री मंगलप्रभात लोढा यांनीही दादर कबुतरखाना बंद होऊ नये, यासाठी कंबर कसली होती. या पार्श्वभूमीवर मंगळवारी मंत्रालयात देवेंद्र फडणवीस, अजित पवार, वनमंत्री गणेश नाईक, गिरीश महाजन, मंगलप्रभात लोढा, कालिदास कोळंबकर, महापालिका आयुक्त भूषण गगराणी आणि वन विभागाचे अप्पर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर यांच्या उपस्थितीत बैठक पार पडली होती. या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईतील कबुतरखाने बंद करु नयेत, असे आदेश महापालिकेला दिले होते.

कबुतरखाने अचानक बंद करणे योग्य नाही. मुंबई महानगरपालिकेने दादर कबुतरखान्यातील पक्ष्यांना नियंत्रित स्वरुपात खाद्य पुरवावे, कबुतरखाने (घरलौरींरी घहरपर) अचानक बंद करण्याऐवजी कबुतरांना कोणत्या वेळेत खाणे द्यावे आणि कोणत्या वेळेत देऊ नये, असा नियम तयार करता येईल, तसेच कबुतरांमुळे निर्माण होणाऱ्या आरोग्याच्या समस्यांचा शाखीय अभ्यास करावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. कबुतराची विष्ठा साफ करण्याचे तंत्र आहे, त्याचाही विचार करा. यासंदर्भात माझी मनेका गांधी यांच्याशी चर्चा झाली आहे. हायकोर्टात राज्य सरकार आणि महापालिकेने ठाम भूमिका मांडावी. पर्यायी व्यवस्था होईस्तोवर महापालिकेने कबुतरांना कंट्रोल फिडिंग करावे. यासंदर्भात गरज पडली तर राज्य सरकार सर्वोच्च न्यायालयात जाईल, असेही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.

### 'मला वाकड्यात जायला लावू नका'

**बीड :** चुका करणाऱ्याला शासन झालं पाहिजे, मग तो कोणत्याही पक्षातला असो अशा शब्दात बीडचे पालकमंत्री आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपली भूमिका मांडली. कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी मदत करण्याचे आवाहन अजित पवार यांनी बीडकरांना केलंय.

# महाराष्ट्रात खतांचा तुटवडा

**नवी दिल्ली :** पावसाळी अधिवेशनात गुरूवारीही गोंधळामुळे नेहमीप्रमाणे ठप्प झालेल्या कामकाजानंतर दुपारी सव्वाबाराच्या सुमारास संसदेत थोडा निवांतपणा जाणवत होता. इतक्यात मकरद्वारा जवळील एका दालनासमोरचा परिसर अचानक घोषणांनी दणाणून गेला आणि सुरक्षा रक्षकांसह सारेच चपापले. केंद्रीय मंत्री जे पी नड्डा यांच्या दालनासमोर या घोषणा देणारे होते. खासदार वर्षा गायकवाड यांच्यासह काही काँग्रेस खासदार आणि त्यांची मागणी होती, महाराष्ट्राच्या शेतकऱ्यांना खतांचा पुरेसा पुरवठा करावा. नवीन संसद भवनात बहुधा प्रथमच, तेही खासदारांकडून आणि त्यातही सरकारमधील क्र. ३ चे स्थान असलेल्या नड्डा यांच्या दलनाबाहेर झालेल्या या घोषणाबाजीने सारेच अवाक झाले. यामुळे नाराज झालेले नड्डा यांनी या खासदारांना, राजनीती में गुस्सा ठीक नहीं होता असे सौम्य शब्दांत समजावले.

# भाजपाच्या माजी प्रवक्त्या उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशपदी!

**अहिल्यानगर :** भाजपाच्या प्रवक्त्या राहिलेल्या आरती साठे यांची मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशपदी नियुक्ती करण्यात आली आहे. सार्वजनिक व्यासपीठावरून सत्ताधारी पक्षाची बाजू मांडणाऱ्या व्यक्तीची न्यायाधीश म्हणून नेमणूक होणं म्हणजे लोकशाहीवर केलेला सर्वांत मोठा आघात आहे. याचा भारतीय न्याय व्यवस्थेच्या निःपक्षपणावर दूरगामी परिणाम



होईल, असे मत राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार यांनी व्यक्त केले. तसेच केवळ न्यायाधीश होण्याची पात्रता आहे म्हणून थेट राजकीय व्यक्तींना न्यायाधीश म्हणून नेमणे म्हणजे न्यायपालिकेला राजकीय आखाडा बनवण्याचा प्रकार नाही का? असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

सदरील नियुक्त व्यक्तीच्या पात्रतेबाबत कुठलाही आक्षेप नाही, परंतु संबंधित व्यक्तीची नियुक्ती करताना न्यायदान हे सामान्य नागरिकांसाठी कोणत्याही अभिनिवेशाशिवाय असते या सामान्य माणसांच्या भावनेलाच आघात बसत आहे. परिणामी संबंधित राजकीय व्यक्तीची न्यायाधीश पदावरील नियुक्तीबाबत पुनर्विचार करावा. सरन्यायाधीशांनी याबाबत मार्गदर्शन करायला हवं, असं मत आ. रोहित पवार यांनी व्यक्त केलं.

यासाठी संविधानात सेपरेशन ऑफ पावरचं तत्व अवलंबलं आहे. राजकीय प्रवक्त्याची न्यायाधीशपदी नियुक्ती म्हणजे सत्तेच्या विकेंद्रीकरणाच्या तत्वाला आणि पर्यायाने संविधानाला हरताळ फासण्याचा हा प्रयत्न नाही का? असाही रोखठोक सवाल त्यांनी केला.

पान १ वरून

### अमेरिकेकडून भारतावर ५० टक्के टॅरिफ

आहे. भारतानं ज्याप्रमाणं इतर अनेक देश स्वतःच्या राष्ट्रीय हितासाठी केलेल्या कृती करतात त्याप्रमाणं केलेल्या कृतीमुळं अमेरिकेने भारतावर अतिरिक्त शुल्क लादण्याचा पर्याय निवडला आहे हे अत्यंत दुर्दैवी आहे. आम्ही पुन्हा सांगतो की ही कृती अयोग्य, अन्यायी आणि अवास्तव आहे, असं विदेश मंत्रालयानं म्हटलं.

### लक्षात ठेवा देशाशी गद्दारी करत आहात

मतदार यादीत संशयास्पद मतदार असल्याचे सांगितले. ते म्हणाले की महाराष्ट्राचे निकाल पाहिल्यानंतर आमच्या शंका निश्चित झाल्या की निवडणूक चोरी झाली आहे. मशीन रीडेबल मतदार यादी न दिल्याने आम्हाला खात्री पटली की निवडणूक आयोगाने भाजपशी संगनमत करून महाराष्ट्राची निवडणूक चोरली आहे. राहुल म्हणाले की आम्ही येथे मतदान चोरीचे मॉडेल सादर केले, मला वाटते की हे मॉडेल देशातील अनेक लोकसभा आणि विधानसभेत वापरले गेले. कर्नाटक निवडणूक आयोगाने राहुलच्या आरोपांवर प्रतिज्ञापत्र मागितले आहे. त्यांनी लेखी तक्रार करावी जेणेकरून पुढील कारवाई करता येईल असे म्हटले आहे.

राहुल म्हणाले की, महाराष्ट्राच्या मतदार यादीतील ४० लाख बनावट नावे रहस्यमय मतदार कुठून आले: महाराष्ट्रात काही महिन्यांत लाखो मतदारांची नावे यादीत जोडण्यात आली, जी खूपच चिंताजनक आहे. ४० लाख मतदार गूढ आहेत. पाच महिन्यांत येथे अनेक मतदार जोडले गेले. निवडणूक आयोगाने मतदार यादीबद्दल उत्तर द्यावे. मतदार यादी बरोबर आहे की चूक हे त्यांनी सांगावे.

सायंकाळी पाचनंतर मतदानात वाढ होणे हे देखील आश्चर्यकारक आहे. संध्याकाळी पाचनंतर मतदान का वाढले? निवडणूक आयोगाने याचे उत्तर द्यावे. काँग्रेस पक्षाने मतांच्या हेराफेरीबाबत निवडणूक आयोगाला प्रश्न विचारले आहेत, परंतु आयोगाने एकही उत्तर दिले नाही. मतांची चोरी पकडण्यासाठी आम्हाला सहा महिने लागले.

### इंडिया आघाडीच्या बैठकीत उद्धव ठाकरे शेवटच्या रांगेत

शिवसेना, भाजप नेत्यांनी ठाकरेंवर बैठक व्यवस्थेवरुन निशाणा साधला आहे. स्नेहभोजनाला राष्ट्रवादी काँग्रेसचे (शप गट) अध्यक्ष शरद पवार, खासदार सुप्रिया सुळे, द्रमुकच्या नेत्या कनिमोळी, शिवसेना (उबाठा) प्रमुख उद्धव ठाकरे आणि त्यांच्या पत्नी रश्मी, सपा नेते अखिलेश आणि रामगोपाल यादव, तृणमूल काँग्रेसचे अभिषेक बॅनर्जी, नॅशनल कॉन्फरन्सचे फारूक अब्दुल्ला, पीडीपी नेत्या मेहबुबा मुफ्ती, डाव्या आघाडीचे डी. राजा नेते राहुल गांधी यांच्या घरी उपस्थित होते. यावेळी ठाकरे सातव्या रांगेत बसल्याचे फोटोंवरुन दिसते.

भाजप प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी एक्सवरुन टीका करताना म्हटलं आहे, की ''उद्धव ठाकरे भाजपसोबत होते, तेव्हा त्यांना आणि मातोश्रीला किती सन्मान होता. देशातील भाजपचे अनेक महत्त्वाचे नेते मातोश्रीवर जाऊन सन्मान करत. २०१९ लोकसभा निवडणुकीच्या वेळी अमित शाह मातोश्रीवर आले होते.'' याची आठवण उपाध्येंनी करुन दिली.

पुढे उपाध्ये म्हणतात की, ''कट टू २०२५, आता पहा, महाविकास आघाडीत आल्यापासून राहुल गांधी, सोनिया गांधी कुणी मातोश्रीवर गेले? उत्तर नाही. बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतीस्थळावर आंदरांजली वाहण्यास कुणी काँग्रेस नेता गेला? उत्तर नाही. बाळासाहेब ठाकरेंचा काँग्रेसने हिंदुहृदयसम्राट असा उल्लेख केला? उत्तर नाही. दरवर्षी आता उद्धव ठाकरेच दिल्लीत राहुल सोनिया गांधींना भेटायला जातात'' अशी टीका केशव उपाध्येंनी केली आहे.

''हिंदुत्व सोडलं, विचारधारा सोडली, त्यातून मान गेला, सन्मान गेला, हातात पडलं काय? आता तर काय बैठकीत अपमानाची थेट शेवटची रांग'' अशी टीकाही उपाध्येंनी केली आहे.

### प्रा. अविनाश सप्रे यांच्या पुस्तकास पुरस्कार

प्रवृत्ती, प्रेरणा आणि प्रवाहांचा चिकित्सक वेध घेतला आहे. ते दिल्लीच्या साहित्य अकादमीचे अनेक वर्षे मराठी विभागाचे सदस्य म्हणून कार्यरत होते. त्याचबरोबर मराठी विश्वकोश प्रा. अविनाश सप्रे निर्मिती मंडळाच्या भारतीय भाषा आणि साहित्य या विभागाचे समन्वयक म्हणून ते कार्यरत होते. महाराष्ट्र फाउंडेशन (अमेरिका) व नाशिक येथील जनस्थान पुरस्कार निवड समितीचे सदस्य म्हणूनही त्यांनी काम पाहिले आहे.

सध्या ते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य आहेत. हा पुरस्कार वितरण सोहळा येत्या १ ऑगस्टला मुंबईत होणार आहे.

### ५०० पेक्षा अधिक तरुणींशी संबंध अन् हजारावर क्लिप्स!

सहभाग आढळला होता. त्याने स्टेबर्ड हॉटेलमध्ये रुम बुकिंग, एकूण ४३ दिवस वास्तव्य केले आहे. विविध महिलांसोबत पार्टीनंतरचेही अश्लील फोटो आणि व्हिडिओ पोलिसांच्या ताब्यात आहेत. हे सर्व गैरकृत्य हेतुपुरस्सर चित्रीत केल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

सानवी बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या तक्रारीनंतर, महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने याची गंभीर दखल घेतली आहे. आयोगाच्या म्हणण्यानुसार, खेवलकर यांनी तब्बल २८ वेळा परप्रांतीय महिलांना आमिष देऊन हॉटेलमध्ये बोलावले, आणि ही बाब मानवी तस्करीसारख्या रॅकेटकडे निर्देश करत आहे.

### निवडणूक अधिकाऱ्यांच्या मानधनात दुपटीने वाढ

बीएलओंना मिळणारा भत्ता १ हजार रुपयांवरून आता २००० रुपये करण्यात आला आहे. पारदर्शक मतदार याद्या ह्या लोकशाहीचा पाया आहेत. निवडणूक नोंदणी अधिकारी, सहाय्यक निवडणूक नोंदणी अधिकारी, बीएलओ पर्यवेक्षक आणि बीएलओ यांचा समावेश असलेली

निवडणूक यंत्रणा मतदार याद्या खूप मेहनतीने तयार करते. ते निष्पक्ष आणि पारदर्शक मतदार याद्या तयार करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात, असे निवडणूक आयोगाने मानधन वाढीची घोषणा करताना जारी केलेल्या एका निवेदनात म्हटले आहे. यामुळे निवडणूक आयोगाने बीएलओंचे वार्षिक मानधन दुपटीने वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच मतदार यादी तयार करणाऱ्या आणि त्यात सुधारणा करणाऱ्या बीएलओ पर्यवेक्षकांच्या मानधनातदेखील वाढ करण्यात आली आहे. याआधी त्यांचे मानधन २०१५ मध्ये वाढवण्यात आले होते. तसेच, आता निवडणूक नोंदणी अधिकारी आणि सहाय्यक निवडणूक नोंदणी अधिकारी यांना पहिल्यांदाच मानधन देण्याचा निर्णय घेतला आहे, असे त्यात नमूद केले आहे.

### पुणे जिल्ह्यात तीन नव्या महापालिका होणार; अजित पवारांनी केली घोषणा

आपल्याला हिंजवडी आणि जो सर्व वरचा परिसर आहे त्या भागामध्ये करावी लागेल. साधारण महानगरपालिका करण्याच्या करता पाच लाख लोकसंख्या असली की महानगरपालिका करता येते, तुम्हाला सगळ्यांनाही माहिती आहे. या सगळ्या भागातील लोकसंख्या किती आहे. चाकणचा प्लॅन देखील आलेला आहे. मी म्हटलं तुम्ही मंजुरी घ्या, मी एकनाथ शिंदे यांची मदत घेतो, असेही पुढे अजित पवार यांनी म्हटला आहे.

चाकण आणि परिसरात महानगरपालिका करावी लागणार आहे, अशी घोषणा अजित पवारांनी यावेळी केली. आज मी चाकणची वाहतूक कोंडी फोडण्याच्या दृष्टीने दौरा केला. सकाळी ५:४५ वाजता मी आलो. नॅशनल हायवे, पीएमआरडीए, जिल्हाधिकारी, पालिकेचे आयुक्त या सर्वांना मी योग्य त्या सूचना दिल्या आहेत. तळेगाव ते शिक्रापूर हा मार्ग सहा पदरी करणार आहे, त्यासाठी निधी ही देतोय. त्यानंतर पुणे–नाशिक हा एलीवेटेड मार्ग करुयात. हे केल्याशिवाय गत्यंतर नाही. तुम्ही खूप त्रास सहन केलाय, तुम्ही सहनशीलता दाखवली. पण आता यातून सुटका करुयात. चाकण आणि परिसरात महानगरपालिका करावी लागणार आहे. काहींना आवडेल न आवडेल, पण हे करावं लागेल, असंही अजित पवारांनी यावेळी म्हटलं आहे. पुणे जिल्ह्यात नव्यानं तीन महापालिका कराव्या लागणार असल्याचं वक्तव्य अजित पवारांनी केलं आहे, मांजरी, फ ुरसुंगी, उरळी देवाची या भागात एक महापालिका आणि चाकण भागात एक आणि हिंजवडी भागात एक महापालिका करावी लागणार आहे, असंही अजित पवारांनी यावेळी बोलताना म्हटलं आहे.

| | | |
|---|---|---|
| चिमण्या चिवचिवल्या | - मा.रा.लामखडे | रु. १०० |
| टिकली तर टिकली | - श्रद्धा बेलसरे | रु. १५० |
| रानसय | - भास्कर चंदनशीव | रु. २२५ |
| निःशब्द कोलाहल | - धनंजय गोवर्धने | रु. ११० |
| आधुनिक मराठी गेय कविता | - डॉ.सयाजीराजे मोकाशी | रु. १७५ |
| मुके जाते गाणे गाते | - विनायक बंगाळ | रु. ९० |
| कानडी मुलखातील मुशाफिरी (प्रवासवर्णन) | - मा.रा.लामखडे | रु. २२० |
| पैंजणांचे झाड | - सिसिलिया कार्व्हालो | रु. १५० |
| काळोखाला दूर सारून | - प्रतिभा जाधव | रु. १४० |
| साळुंकीची सावली | - महावीर जोंधळे | रु. १८० |
| उत्कर्षवाटा (पुणे विद्यापीठ) | - संपा.डॉ.लांडगे, डॉ.रोंगटे, डॉ.सांगळे | रु. १२० |
| रंग जीवनाचे | - बबन काकडे | रु. २५० |
| च्यामारी | - डॉ.प्रमोद काळे | रु. १८० |
| कुब्र | - सत्यजित पाटील | रु. २३० |
| **नाटक/एकांकिका/चित्रपट विषयक** | | |
| तुंबारा | - सयाजी शिंदे | रु. २५० |
| तृतीय रत्न (नाटक) (जळगाव विद्या. अभ्यासक्रमात समाविष्ट) | - ले.जोतिराव फुले, संपा. दत्ता भगत | रु. २२५ |
| माझं घर | - जयंत पवार | रु. १६० |
| जनक | - शार्दुल सराफ | रु. १५० |
| हंडाभर चांदण्या (संहिता आणि लेख) (पुणे विद्यापीठ) | - दत्ता पाटील/ संपा.सतिश बडवे | रु. १५० |
| राहिले दूर घर माझे | - शफाअत खान | रु. १४० |
| चौक | - मकरंद साठे | रु. १२० |
| मंथरक आणि इतर एकांकिका | - जयसिंग पाटील | रु. ९० |
| जाता नाही जात | - सिद्धार्थ तांबे | रु. १५० |
| सप्तरंगी एकांकिका | - दयाराम गिलाणकर | रु. १२० |
| प्रत्ययकारी परदेशी सिनेमा | - उदय कुलकर्णी | रु. ६५० |
| **चरित्र/आत्मचरित्र** | | |
| श्री.संत चोखामेळा : चरित्र आणि अभंग | - संपा.स.भा.कदम, प्रस्ता.भालचंद्र नेमाडे | रु. १६० |
| जिजी (शेतकरी आईची जीवनगाथा) | - प्रा.सौ.लिला जंजिरे | रु. २०० |
| कोकरूड ते बर्मिंगहॅम | - प्रा.अब्दुलगनी अत्तार | रु. ३७५ |
| सुंबरान | - दिनकर यमनाजी शेलार | रु. २५० |
| पंख गळून गेले तरी | - सुधीर देवरे | रु. ८० |
| स्त्रीरत्न क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले | - रावसाहेब चोले | रु. ७५ |
| मलिक अंबर | - वि.स.वाकसकर | रु. १०० |
| लावणी सम्राज्ञी (यमुनाबाई वाईकर यांचे चरित्र) | - प्रभाकर ओव्हाळ | रु. २५० |
| कांताबाई सातारकर | - संतोष खेडलेकर | रु. २०० |
| स्वातंत्र्यसूर्य महाराणा प्रताप | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २०० |
| संत मीराबाई | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २०० |
| मी तो हमाल | - आप्पा कोरपे | रु. १५० |
| प्रकाशाची बेटे | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २२० |
| **कविता संग्रह** | | |
| बालकवींच्या निवडक कविता | - संपा.ना.धों.महानार | रु. ११५ |
| वसा | - वसंत सावंत | रु. ७५ |
| सुमती लांडे : समग्र कविता | - संपादक : कविता मुरुमकर/ सुमती लांडे | रु. ५९९ |
| कमळकाचा | - सुमती लांडे, चित्रप्रत्यय- प्रभाकर कोलते | रु. २०० |
| वाहते अंतर | - सुमती लांडे | रु. ९० |
| तुकाराम : अहिराणीत निरुपण | - डॉ.एस.के.पाटील | रु. ५२५ |
| बोलावे ते आम्ही (साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त) | - श्रीकांत देशमुख | रु. ३८० |
| येरू म्हणे | - प्रवीण बांदेकर | रु. १०० |
| बोलावे ते आम्ही | - श्रीकांत देशमुख | रु. ३८० |
| ऋतुपर्णाच्या कविता | - जितेंद्र कुंवर | रु. ३०० |
| आवानओल | - अजय कांडर | रु. १०० |
| प्रलयानंतरची तळटीप | - सुचिता खल्लाळ | रु. २२५ |
| दंडविधान | - मनोज सुरेंद्र पाठक | रु. २७० |
| एक शून्य प्रतिक्रिया | - व्यंकटेश चौधरी | रु. २०० |
| माणूस उकरून काढावा लागतोय | - सिसिलिया कार्व्हालो | रु. २०० |
| ज्याचा त्याचा चांदवा | - अंजली ढमाळ | रु. २२० |
| दुभंगवाणी | - डॉ.नंदू मुलमुले | रु. १५० |
| गरम झळा आणि संभ्रमाची फळे | - पोपट सातपुते | रु. १०० |
| भुईशास्त्र (साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त) | - ऐश्वर्य पाटेकर | रु. २२० |
| भुई तापाचे बळी | - प्रभाकर महाजन | रु. १६० |
| हिन्दोल | - संध्या शहापुरे | रु. २५० |
| अस्वस्थ क्षणांचे पाश | - समाधान महाजन | रु. १२० |
| विसविशीत जगण्याच्या उंबरठ्यावरून | - विलास माळी | रु. २०० |
| तहानलेले पाणी | - मारुती सावंत | रु. १२० |
| पाच बिघे | - लक्ष्मण बारहाते | रु. ८० |
| रक्तसेतू | - सुखदेव ढाणके | रु. १०० |
| हुर्दक | - सुखदेव ढाणके | रु. ९० |
| ओले अथांग श्वास | - रामकली पावसकर | रु. १०० |

| | | |
|---|---|---|
| स्त्री कुसाच्या कविता | - लक्ष्मण महाडीक | रु. १२५ |
| कुणब्याची कविता | - लक्ष्मण महाडीक | रु. १३० |
| बळीचं जिणं | - दयाराम गिलाणकर | रु. १०० |
| कविता दिक्षेच्या | - महेंद्र भास्कर पाटील | रु. ८० |
| मेघवृष्टी | - जयराम खेडेकर | रु. १०० |
| विलग | - गणेश आत्माराम वसईकर | रु. ९० |
| वादळवाट | - वंदना महाजन | रु. १५० |
| जिवन नरहची आसामी कविता | - अनु.शोभा नाईक | रु. ७५ |
| ब्रम्हसोपान | - रेषा आकोटकर | रु. ९० |
| एक टुकडा आसमाँ का | - विश्वजीत तुळजापूरकर | रु. ७५ |
| एका गोरज घडीला (O.P) | - अरुण सांगोळे | रु. ७५ |
| नांगरून पडलेलं शतक | - रमेश चिल्ले | रु. ८० |
| अनुकार | - जयश्री पाठक | रु. ९० |
| खानदानी | भगवान देशमुख | रु. ८० |
| जगण्याच्या कोलाहलात | - गणेश मरकड | रु. २०० |
| आयडियल स्टेटच्या हद्दीबाहेरून | - सिद्धार्थ तांबे | रु. ७० |
| ओंजळींनी अंबर व्हावे | - रमेश मगरे | रु. ११० |
| निरिच्छ नभ | - विनायक त्र्यं.पाटील | रु. ७० |
| रूप-अरूपाचे | - अशोक सोनवणे | रु. १०० |
| भोग सरू दे उन्हाचा | - कैलास दौंड | रु. ९० |
| इंद्रधनूच्या कमानीवर | - राजेश जाधव | रु. १०० |
| अक्षरऋतू | - प्रमोद जोशी | रु. १०० |
| रानभरारी | - गुंफा कोकाटे | रु. ८० |
| पाऊल खुणा | - संजीव दुधाट | रु. ८० |
| बाणगंगेच्या तिरी | - डॉ.मधुकर कवडे | रु. ९० |
| जन्मांतर | - शुभम अनिल दुरगुडे | रु. १२० |
| निवडक कविता | - संपा.प्रा.डॉ.वसंत शेकडे | रु. १०० |
| फिर्याद | - हिरा बनसोडे | रु. १०० |
| दाहगाथा | - कैलास सलादे | रु. १२० |
| अकुतोभय | - निलेश शेळके | रु. १४० |
| संदर्भासहित स्पष्टीकरण | - इरावती इंगले-यादव | रु. १२० |
| सूर्य गेला नाही अजून अस्ताला | - विनायक हिरवे | रु. १५० |
| जखमी पावलांचे ठसे | - कैलास जिजाबाई चावडे | रु. १२० |
| केकतीची फुले | - ल.सि.जाधव | रु. १०० |
| काव्यबंध (मुंबई विद्यापीठ) | - संपा.डॉ.नीलकंठ शेरे/डॉ. नानासाहेब यादव/ डॉ.जगदिश राणे | रु. २०० |
| मी मातीचे फूल | - मीनल येवले | रु. २०० |
| ऐन पस्तिशीत | - दिलीप वीरखेडे | रु. ८० |
| काव्यभान | - रविंद्र कांबळे | रु. १०० |
| धुनी (O.P) | - सुरेश सावंत | रु. २०० |
| काहीच नष्ट होत नसतं | - विजय चोरमारे | रु. १६० |
| गाव हाकेच्या अंतरावर (O.P) | - जगदीश कदम | रु. १२० |
| माणूसनामा | - कैलास पगारे | रु. १२० |
| साकल्याच्या प्रदेशात | - डॉ.सिसिलिया कार्व्हालो, डॉ.धनाजी गुरव, डॉ.निलकंठ शेरे | रु. १५० |
| अधांतर अंधारात | - महेश केळुसकर | रु. २२० |
| आत्मपीठ | - मंदाकिनी पाटील | रु. २६० |
| पद्म गोपाळ | - सौ.निर्मला काळे | रु. ३०० |
| काव्यरंग | - डॉ.आरेकर, डॉ.यादव, डॉ.राणे | रु. २२० |
| हंबरवाटा | - संतोष आळंजकर | रु. २५० |
| दंडविधान | - मनोज पाठक | रु. २७० |
| कथार्सिस | - सारिका उबाळे | रु. ३४० |
| **चरित्र** | | |
| संत गाडगेबाबा | - विजय पाटील | रु. ३० |
| बहिणाबाई चौधरी | - मृण्मयी पाटील | रु. ३० |
| अहिल्याबाई होळकर | - विजया पाटील | रु. ३० |
| स्त्रीरत्न सावित्रीबाई फुले | - रावसाहेब चौले | रु. ७५ |
| अहिल्याबाई होळकर | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| बहिणाबाई चौधरी : चरित्र आणि निवडक कविता | - सुमती पाटील | रु. ५० |
| डॉ.अब्दुल कलाम : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| इंदिरा गांधी : चरित्र आणि कार्य | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| पंडित जवाहरलाल नेहरु : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| महात्मा ज्योतिबा फुले : चरित्र आणि कार्य (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| राष्ट्रपिता महात्मा गांधी | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| सावित्रीबाई फुले : चरित्र आणि कार्य (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| सम्राट अशोक : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| शाहू महाराज : चरित्र आणि कार्य | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| जे.आर.डी.टाटा | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| यशस्वी भारतीय महिला (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| झाशीची राणी : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. १०० |
| पंडित दीनदयाळ उपाध्याय | - सुमती पाटील | रु. ५० |

| | | |
|---|---|---|
| **सामान्यज्ञान** | | |
| आधुनिक बेकरी व्यवसाय तंत्रज्ञान | - यू.डी.चव्हाण | रु. १००० |
| **शैक्षणिक/बाल/कुमार/प्रौढ साक्षर/इत्यादी** | | |
| निसर्गाकडे चला | - डॉ.गजानन पाटील | रु. १४० |
| तंत्र तणावमुक्तीचे | - डॉ.गजानन पाटील | रु. ४० |
| तंत्र व्यक्तिमत्व विकासाचे भाग १ | - डॉ.गजानन पाटील | रु. ६० |
| तंत्र व्यक्तिमत्व विकासाचे भाग २ | - डॉ.गजानन पाटील | रु. १२५ |
| मानसिक तणावमुक्त अध्यापन प्रतिमान (O.P) | - डॉ.गजानन पाटील | रु. १०० |
| पर्यावरण प्रकल्प कार्य (O.P) | - डॉ.तरुजा भोसले | रु. २५० |
| शालेय ग्रंथालय व्यवस्थापन | - डॉ.सी.श्री.पाटील | रु. १५० |
| शब्दसंपदा : निवडक भाषणे | - डॉ.भगवान सावंत | रु. ८० |
| सप्तरंगी एकांकिका | - दयाराम गिलाणकर | रु. १२० |
| आठवणी यदुनाथांच्या | - संपा.डॉ.प.शं.झेंडे | रु. ७० |
| योगासनांची ओळख | - डॉ.प.शं.झेंडे | रु. ४५ |
| अध्यात्म, विज्ञान व संस्कार मूल्य | - दत्तात्रय चिताळकर | रु. १०० |
| गीतइसापनीती | - उषा परब | रु. ८० |
| करामती प्रकाश | - विजय नांगरे | रु. ५० |
| ओंजळीतील मोती | - प्रमिला हनुमंतराव रासकर | रु. १२० |
| एड्स | - विजया पाटील | रु. १५ |
| चिकुनगुणिया | - डॉ.एस.के.पाटील | रु. १५ |
| नखे कापा - निरोगी राहा | - डॉ.राजेंद्र मलोसे | रु. ३५ |
| खानदेशी गाव | - आबा महाजन | रु. १८० |
| नखपुराण | - डॉ.राजेंद्र मलोसे | रु. १५ |
| परोपकारी शंकर | - विजय नांगरे | रु. १५ |
| बहुगुणी तुळस | - डॉ.मंगला काजळे | रु. १५ |
| आपला नांदेड जिल्हा | - सुमती पाटील | रु. ३० |
| मालगुंडचा सिद्धू | - आनंद वाघ | रु. ३०० |
| बालसंस्कार | - ताई पवार | रु. १०० |
| आम्ही भी घडणार | - ताई पवार | रु. ११५ |
| विज्ञान कोडे | - ताई पवार | रु. १२० |
| दिशा नवोपक्रमाची | - ताई पवार | रु. १४० |
| श्री गणेशा शिक्षणाचा | - ताई पवार | रु. ९० |
| छत्रपती शिवाजी राजेभोसले यांचा पवाडा | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १०० |
| गुलामगिरी | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १५० |
| शेतकऱ्याचा असूड | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १५० |
| योग - सर्वांसाठी | - आनंद वाघ | रु. २५० |
| योगा - खेळ, छंद आणि संस्कार | - आनंद वाघ | रु. २५० |
| कोविड १९ - अकल्पीत चकवा | - आनंद वाघ | रु. २०० |
| स्त्री - पुरुष तुलना | - ताराबाई शिंदे - संपा.महेंद्र मुंजाळ | रु. १२५ |
| महाराष्ट्रातील समाजसुधारक | - अे. देशमुख | रु. ८० |

**कृषि विषयक पुस्तके**

**डॉ. यू. डी. चव्हाण / डॉ. पी. जी. पाटील**

| | |
|---|---|
| मधुमक्षिका पालन - आळींबी लागवड (शेतीतील जोडधंदे) | रु. ७२० |
| पेपेन उद्योग - रेशीम उद्योग (शेतीतील जोडधंदे) | रु. ७०० |
| कुक्कुट पालन-ससे पालन (शेतीतील जोडधंदे) | रु. ७०० |
| शेळी पालन - मेंढी पालन (शेतीतील जोडधंदे) | रु. ७१० |
| पशुपालन व दुग्धव्यवसाय - गांडुळ खत निर्मिती प्रकल्प | रु. ७०० |
| वराह पालन - मत्स्य उद्योग (शेतीतील जोडधंदे) | रु. ७०० |
| महिलांना करता येण्यासारखे उद्योग (शेतीतील जोडधंदे) | रु. ६९० |
| कृषि अवजारे व यंत्राचा उपयोग (शेतीतील जोडधंदे) | रु. २६० |
| मसाला प्रक्रिया उद्योग | रु. ५७० |
| मत्स्य प्रक्रिया उद्योग | रु. ७०० |
| आंबा-केळी-द्राक्ष प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| अननस-चिकू-पेरु प्रक्रिया उद्योग | रु. ६३० |
| अंजिर-चिंच-जांभूळ-पपई-स्ट्रॉबेरी प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| आवळा-डाळींब-बोर-प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| दूध व दुग्धजन्य पदार्थ | रु. ६५० |
| फळभाज्या प्रक्रिया उद्योग | रु. ६४० |
| काजू-कवठ-फालसा-कृष्णफळ-करवंद-सफरचंद-कोकम-फणस-उंबर-लिची प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| लिंबूवर्गीय फळे प्रक्रिया उद्योग | रु. ६३० |
| मांस-मटन-अंडी प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| टोमॅटो-बटाटा-कांदा-लसूण-प्रक्रिया उद्योग | रु. ६१० |
| तृणधान्य-कडधान्य-गळीतधान्य प्रक्रिया उद्योग | रु. ७१० |
| वाईन उद्योग | रु. ७५० |
| कृषि क्षेत्रातील कृषि उद्योग | रु. ५५० |
| कृषि प्रक्रिया उद्योग कोश | रु. २००० |
| अक्षय उर्जा | रु. १७० |


**शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर यांची महत्त्वाची पुस्तके मागविण्यासाठी खालील नंबरवर संपर्क करा – मो. ९०११२०१४१४ / ९८२२५२५४४४**


CMS
CREATIK
MULTI SERVICES PVT LTD



Discover Pustakvari : The Ultimate eBook Platform
State-of-the-Art eBook Readers
Advanced Security and Technology
Intelligent Search and Realistic Viewing Experience
Expansive Content Library
Global Accessibility and Multi-Publisher Platform

Tailored Solutions for Institutes and Libraries
Interactive Learning with General Knowledge Software
Smart Recommendations and User Customization



Digital India
Vision India
MAKE IN INDIA
MSME

Contact US
Email : creatikpvtltd44@gmail.com
Contact : +91 22 3599 9192 I +91 9822525444
Website : creatikmultiservices.com

Gut No. 125, Ranjankhol, Tal. Rahata, Dist. Ahmednagar 413709

# योजनांची प्रत्यक्ष पाहणी करुन अधिकाऱ्यांनी उपाययोजना कराव्यात : ना. विखे



**राहाता :** जलजीवन मिशन व ग्रामीण पाणीपुरवठा योजनेंतर्गत सुरू असलेल्या प्रलंबित कामांचा अहवाल महिन्याअखेर सादर करण्याच्या सूचना चालू जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या. योजनेतील त्रुटी दूर करण्यासाठी अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष योजनांची पाहाणी कराबी, योजनेच्या झालेल्या प्रश्नासंदर्भात उपाय योजना करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

राहाता पंचायत समितीच्या सभागृहात मंत्री विखे पाटील यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण तसेच जिल्हा परिषदेच्या अंतर्गत राहाता, संगमनेर, श्रीरामपूर, राहधरी तालुक्यात सुरू असलेल्या जलजीवन मिशनच्या कामांचा आढावा घेतला.

बैठकीस जिल्हा परिषदेचे अतिरिक्त कार्यकारी अधिकारी विजय मुळे, मुख्याका मिशन अधीक्षक अभिवता सुनंदा विभागाचे कार्यकारी अभियंता गणेश भोगावडे व हितेंद्र चव्हाण, गटविकास अधिकारी विवेक गुंड आदी उपस्थित होते. मंत्री विखे म्हणाले की, योजनामधील पाईप टाकताना रस्त्यांच्या निर्माण झालेल्या समस्यांची गांभीयनि दखल घेवून योजनेतील तरतूदी प्रमाणे रस्त्यांच्या लोणी दुरुस्तीची कामे तातडीने करा बुद्रुक व लोणी खुर्द येथे अऑक्टोबर २०२५ पर्यंत पाणी पुरवठा योजना सुरू होईल, यासाठी आवश्यक त्या सर्व कामांची पूर्तता करण्यात यावी। ममदापूर येथील टाक्या व सचेत लावावीत. बाकडी येथील पाइपलाइनचे काम डांबरी रस्त्यावर न करता पर्यायी मागनि पूर्ण करावे. रस्ते खोदल्यानंतर माती उचड्यावर पडणार नाही याची अधिकाऱ्याऱ्यांनी दक्षता घेण्याचे मंत्री विखे यानी सूचित केले. धनगरवाडी येथील रखडलेली कामे तत्काळ पूर्ण करावीत. कडीत येथील जुन्या पाणीपुरवठा योजनेतील साचलेली घाण त्वरित स्वच्छ करण्यात यावी. अनेक ठिकाणी उन्हामध्ये पडून पाइपलाइन खराब झाल्याचे निदर्शनास आले असून, विभागाने त्यांनी सूचित केले. सोनगाव पाणी पुरवठा योजनेसाठी आवश्यक जागा उपलब्ध करून देण्यासाठी राहुरी तहसीलदार व गटविकास अधिकारी यांच्याशी समन्वय साधावा. पाइपलाइनसाठी डांबरी रस्ते खोदणे टाळावे. जिथे रस्ते खोदण्यात आले आहेत, त्या ठिकाणांची माहिती संकलित करून अहवाल सादर करण्यात यावा. पाणीपुरवठा योजनेतील अनियमिततेचा सविस्तर अहवाल तयार करण्यात यावा. निमगाव जाळी पाणीपुरवठा योजनेसाठी महसूल विभागामार्फत जागा उपलब्धा करून देण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी दाढ बुद्रुक, कोल्हेवाडी, शिंगवे, पिंपळवाडी नपावाडी, कोहडि बाळकी, खडकेबाके, डोन्हाळे, साकुरी, योजनांचा आढावा घेण्यात आला. तसेच जिल्हा परिषद पाणीपुरवठा योजनांतर्गत सावळीविहीर बुदक, अस्तगाव, नांदुखों, पिंपरी निर्मळ, बाभळेश्वर, चितळी, जळगाव या गावांतील व संगमनेर तालुक्यातील आश्वी व चिंचोली येथील कामांचा आढावा घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या.

## निवडणुकीतून व्हीव्ही-पॅट मशीन होणार गायब

**नाशिक :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढील ४ महिन्यात घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. त्यासाठी, मतदान केंद्राची संख्या निश्चित करणे, मतदान यंत्राची व्यवस्था करणे, निवडणुकांसाठी आवश्यक असणाऱ्या अधिकारी कर्मचारी संख्याचा आढावा घेण्यासाठी निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी मंगळवारी नाशिक दौरा केला. दिवाळीनंतरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका टप्प्याटप्प्याने होतील मात्र यावेळी निवडणुकीत व्हीव्हीपॅट मशिन नसणार, अशी माहिती निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिली. सर्वो च्च न्यायालयाच्या निर्णयानंतर निवडणूक आयोगानेही तयारी सुरू केली असून राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे यांनी मंगळवारी नाशिक जिल्ह्यात जाऊन आढावा घेतला. आगामी निवडणुकांच्या अनुषंगाने माहितीही देताना ते म्हणाले, नाशिक विभागात ५० लाख ४५ हजार मतदार आहेत, ४ हजार ९८२ मतदान केंद्र, त्यासाठी ८ हजार ७०५ कँट्रोल युनिट लागणार असून १७ हजार मतदान यंत्रांची गरज भासणार असल्याचं त्यांनी म्हटलं.

## दुष्काळी भागात जलक्रांती आणणार : डॉ विखे

**संगमनेर :** त्यांनी अठरा वर्षात फक्त पाच कोटी रुपये खर्च केले. पुढच्या अडीच वर्षात जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि आ. अमोल खताळ यांच्या माध्यमातून २५ कोटी रुपयांच्या विकासकामांचे नियोजन करून दुष्काळी भागाला सुजलाम सुफलाम करण्याचा आमचा प्रयत्न असेल, अशी ग्वाही पदमश्री

**अठरा वर्षात त्यांनी पाच कोटी खर्च केले**

डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी दिली.



भोजापूर चारीचा जलपूजन सोहळा नान्नज दुमाला येथे डॉ. विखे पाटील यांच्या उपस्थितीत झाला. त्यावेळी ते बोलत होते. नीलम खताळ, माजी तालुकाध्यक्ष भीमराव चतर, शिवसेनेचे विठ्ठलराव घोरपडे संदीप देशमुख यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

डॉ. विखे म्हणाले की, ४० वर्ष सत्तेत राहून पाणी न आणणाऱ्यांना जनतेने बाजूला केले आणि महायुतीवर विश्वास ठेवला. आज त्या विश्वासाला उत्तर दिले जात आहे. मी यापूर्वी शब्द दिला होता की ज्या दिवशी पाणी पोहोचेल, त्या दिवशीच मी इथे सभा घेईन. आज तो दिवस आहे. ही केवळ सभा नाही तर जनतेच्या आश्वासनपूर्तीची साक्ष आहे. अमोल खताळ यांनी हा संपूर्ण भाग पाणीदार करण्यासाठी जिद्दीने पाठपुरावा केला. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून हा भाग आता जलसमृद्ध होतोय. त्यांच्या खांद्यावर जबाबदारी देण्यात आली आणि त्यांनी ती यशस्वीपणे पार पाडली याचा सार्थ अभिमान आहे.


**महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद यांच्या पत्रानुसार राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे यांच्यातर्फे निवडण्यात आलेली नगरपालिका व जिल्हापरिषद शाळेंसाठी निवडक वाचनीय पुस्तकांची यांदी**

| अ.नं. | पुस्तकाचे नाव | लेखक | किंमत |
|---|---|---|---|
| १ | गोष्ट कॉम्प्युटरची | संदीप लांडे | 100 |
| २ | जलऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| ३ | अंतराळ- २ | संदीप लांडे | 150 |
| ४ | रोमांचकारी सफर | सौ.संज्योत बानुबाकोडे | 100 |
| ५ | पेरणी | आबा गोविंदा महाजन | 100 |
| ६ | हिऱ्यांची पिशवी | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ७ | करामती प्रकाश | विजय नागरे | 150 |
| ८ | अद्भूताचा शोध | विजय नागरे | 130 |
| ९ | जग बदलणारे ५० शोध | आनंद वाघ | 120 |
| १० | घाबरलेल्या सुषमाची गोष्ट | सुमति लांडे | 130 |
| ११ | प्राणी गायब होऊ लागले | आबा गोविंदा महाजन | 150 |
| १२ | बोधकथा | मृण्मयी पाटील | 100 |
| १३ | संवेदना आणि इतर कथा | बाळ पोतदार | 110 |
| १४ | पीठाचा माठ | संतोष खेडलेकर | 100 |
| १५ | आनंदी गाणी | स्नेहा पाटील | 100 |
| १६ | मुलांसाठी शोर्यकथा | संतोष खेडलेकर | 110 |
| १७ | बिल्लू | श्यामला एस. | 100 |
| १८ | करामती मुंग्या | संज्योत बनूबकोडे | 100 |
| १९ | जलधारा | मृण्मयी पाटील | 100 |
| २० | अशी मोडली खोड | मृण्मयी पाटील | 100 |
| २१ | निसर्ग माझा सवंगडी | संदीप लांडे | 100 |
| २२ | पवन ऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| २३ | निसर्गाचे संवर्धन का करावे | संदीप लांडे | 200 |
| २४ | सौर ऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| २५ | शाळा सवंगडी | विजय नागरे | 130 |
| २६ | आमची शाळा | विजय नागरे | 130 |
| २७ | कौशल्य | विजय नागरे | 100 |
| २८ | इवलासा ससा | संज्योत बनूबकोडे | 100 |
| २९ | स्वातंत्र्यसंग्रामाच्या शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 100 |
| ३० | पिंकू आणि सोनू | श्यामला एस. | 100 |
| ३१ | महानायक | संतोष खेडलेकर | 100 |
| ३२ | संस्कार कथामाला | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ३३ | देण्याचा आनंद | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ३४ | सफर जगातल्या आश्चर्याची | संतोष खेडलेकर | 120 |
| ३५ | किलबिल गोष्टी | नामदेव माळी | 150 |
| ३६ | हिम्मत | विजय नागरे | 150 |
| ३७ | बी ची गोष्ट | सुनील भोडगे | 100 |
| ३८ | दोरीची करामत | विजय नागरे | 100 |
| ३९ | ऐतिहासिक शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 130 |
| ४० | चांगला मित्र | सौ.संज्योत बानुबाकोडे | 100 |
| ४१ | सईचे पंख | विजय नागरे | 150 |
| ४२ | मी अब्दुल कलाम | मृण्मयी पाटील | 100 |
| ४३ | पाण्याविषयी सर्वकाही | संदीप लांडे | 100 |
| ४४ | नाच रे मोरा | सूचित पाटील | 100 |
| ४५ | कावळा काळा कसा झाला | श्यामला एस. | 100 |
| ४६ | रोबोट माझा मित्र | विशाल तायडे | 160 |
| ४७ | उद्धट नंदू | श्यामला एस. | 100 |
| ४८ | झाडाची गोष्ट | शाल्मल लांडे | 100 |
| ४९ | चला पावसाच्या पाण्याची बचत करू | संदीप लांडे | 130 |
| ५० | कचरा व्यवस्थापन | संदीप लांडे | 200 |
| ५१ | हूशार बकरी | बाळ पोतदार | 100 |
| ५२ | आपले हरित घर | संदीप लांडे | 100 |
| ५३ | आपली हरित शाळा | संदीप लांडे | 100 |
| ५४ | मालगुंडचा सिद्धू | आनंद वाघ | 100 |
| ५५ | अद्भुत पोषोख | विजय नांगरे | 160 |
| ५६ | सातपुड्याच्या जंगलामध्ये | आबा गोविंदा महाजन | 100 |
| ५७ | रणरागिणींच्या शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 100 |
| ५८ | बबलू खरेदीला जातो | श्यामला एस. | 100 |
| ५९ | चिंटू नावाचा कोल्हा | श्यामला एस. | 100 |
| ६० | दोन जादूगार | रमेश महाले | 100 |
| ६१ | हरवलेला धबधबा | श्यामला एस. | 100 |
| ६२ | चतुर कोल्हा वेंधळा बोकड | मृण्मयी पाटील | 100 |
| ६३ | दिनेशची समुद्र किनाऱ्यावरील सफर | श्यामला एस. | 100 |
| ६४ | प्राणीसृष्टी भाग-१ | रमेश महाले | 200 |
| ६५ | कागा आणि नारळ | श्यामला एस. | 100 |
| ६६ | दिशा नवोपक्रमाची | ताई पवार | 160 |
| ६७ | नशिबाची साथ | विजय नागरे | 100 |
| ६८ | वृक्षगान | लैला महाजन | 100 |
| ६९ | वृक्षवल्ली आम्हा सोयरे | लीलावती भागवत | 100 |
| ७० | म्हणींचा शोध मनास बोध | म.ना. जोशी | 100 |
| ७१ | एकमेका सहाय्य करू | म.ना. जोशी | 100 |
| ७२ | राजा पिल्लाची गोष्ट | लीलावती भागवत | 100 |
| ७३ | छान छान गोष्टी | रोहिणी कुलकर्णी | 100 |
| ७४ | बछडा | मुकुंद निगवेकर | 100 |
| ७५ | संस्कार गोष्टी | म.ना. जोशी | 100 |
| ७६ | सुबोध कथा | मीरा जाधव | 100 |
| ७७ | उपेक्षित बालके | म.ना. जोशी | 100 |
| ७८ | चोरीची माया | बबन खंडगळे | 100 |
| ७९ | गोष्ट राम्पुरीची | बबन खंडगळे | 100 |
| ८० | टीमटीमणारे तारे | स्नेहलता बावळे | 100 |
| ८१ | १११ बोधकथा | हेमंत गोखले | 100 |
| ८२ | सृष्टीशी जडवू नाते | लीलावती भागवत | 100 |
| ८३ | आदर्श गोष्टी | शोभा जोशी | 100 |
| ८४ | अशीही दिवाळी | वर्षा गडकर | 100 |
| ८५ | स्वप्नाचा पाठपुरावा | वर्षा गडकर | 100 |
| ८६ | म्हणीच्या बोधकथा | म.ना. जोशी | 100 |
| ८७ | मजेदार मज्जा | स्नेहलता बावळे | 100 |
| ८८ | व्यंगावर मात | वर्षा गडकर | 100 |
| ८९ | धाडसी आजी | वर्षा गडकर | 100 |
| ९० | आपले पक्षी-सखे सोबती भाग १ | मंगेश कश्यप | 100 |
| ९१ | आपले पक्षी-सखे सोबती भाग २ | मंगेश कश्यप | 100 |
| ९२ | आपले पक्षी-सखे सोबती भाग ३ | मंगेश कश्यप | 100 |
| ९३ | छोट्यांसाठी मोठ्या गोष्टी | वर्षा गडकर | 100 |
| ९४ | सुसंस्कारीत मनोबल | शोभा जोशी | 100 |
| ९५ | मुल नव्हे देवदूतच | नीला कदम | 100 |
| ९६ | वसा स्वावलंबनाचा | शोभा जोशी | 100 |
| ९७ | गुडबाय छोट्या मित्रा आणि इतर गोष्टी | विनया साठे | 100 |
| ९८ | एक झाड लावू मित्रा | अनंत भावे | 100 |
| ९९ | गोष्टीरूप चाणक्य | राजेंद्र खरे | 150 |
| १०० | माणुसकीचा श्वास | नीला कदम | 100 |
| १०१ | पोषक गोष्टी भाग १ | शोभा जोशी | 100 |
| १०२ | पोषक गोष्टी भाग २ | शोभा जोशी | 100 |
| १०३ | विचार यशाचाच | वर्षा गडकर | 100 |
| १०४ | खरी कमाई | शोभा जोशी | 100 |
| १०५ | नातं | वर्षा गडकर | 100 |
| १०६ | बाल रक्षक कायद्याचे | अविनाश भोंडवे | 100 |

**वरील पुस्तके मागविण्यासाठी समोरील नंबरवर संपर्क करा - मो. ९०११२०१४१४/९८२२५२५४४४**


## भारतीय संघ ऑक्टोबरमध्ये ऑस्ट्रेलियाचा दौरा करणार




मुंबई : भारतीय क्रिकेट संघ ऑक्टोबर महिन्यात ऑस्ट्रेलियाचा दौरा करणार आहे. भारत ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्याची सुरुवात आशिया कप स्पर्धेनंतर होईल. भारताचा ऑस्ट्रेलिया दौरा १९ ऑक्टोबर ते ८ नोव्हेंबर या दरम्यान सुरु राहील. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात ३ वनडे आणि ५ टी २० सामने खेळणार आहे. मात्र, यापूर्वी ऑस्ट्रेलियाचा अ संघ भारताचा दौरा करणार आहे. ऑस्ट्रेलिया अ संघ भारत दौऱ्यात ४ दिवसांचे दोन कसोटी सामने आणि तीन एकदिवसीय सामने खेळणार आहे. यासाठी क्रिकेट ऑस्ट्रेलियानं अ संघाची घोषणा केली आहे. ऑस्ट्रेलिया अ संघात सॅम कोनस्टासला स्थान देण्यात आलं आहे. सॅम कोनस्टासनं जसप्रीत बुमराह सोबत पंगा घेतला होता. त्याला ऑस्ट्रेलिया अ संघात संधी मिळाली आहे.

भारत अ आणि ऑस्ट्रेलिया अचं वेळापत्रक

ऑस्ट्रेलियाच्या अ संघाचा भारत दौरा १६ सप्टेंबर पासून सुरु होऊन ५ ऑक्टोबर पर्यंत सुरु राहील. या दौऱ्यावर पाच सामने खेळले जातील. यामध्ये दोन कसोटी आणि तीन एकदिवसीय सामन्यांचा समावेश आहे. टीम इंडिया आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील दोन कसोटी सामने लखनौ आणि कानपूरमध्ये होतील. तर, एकदिवसीय सामने कानपूरमध्ये होणार आहेत. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील मुख्य संघाची मालिका सुरु होण्यापूर्वी अ संघांमधील सामने संपणार आहेत.

पहिली कसोटी मॅच: १६-१९ सप्टेंबर, कानपूर
दूसरी कसोटी मॅच: २३-२६ सप्टेंबर, लखनौ
पहली वनडे: ३० सप्टेंबर, कानपूर
दूसरी वनडे: ३ ऑक्टोबर, कानपूर
तीसरा वनडे: ५ ऑक्टोबर, कानपूर

४ दिवसांच्या कसोटीसाठी ऑस्ट्रेलियाचा अ संघ

जेवियर बार्टलेट, कूपर कोनोली, जॅक एडवर्ड्स, आरोन हार्डी, कॅम्पबेल केलावे, सॅम कोनस्टास, नाथन मॅकस्वीनी, लांस मॉरिस, टॉड मर्फी, फर्गस ओनील, ओलिवर पीक, जोश फिलिप, कोरी रोचिचियोली आणि लियाम स्कॉट

वनडे साठी ऑस्ट्रेलियाचा अ संघ

कूपर कोनोली, हॅरी डिक्सन, जॅक एडवर्ड्स, सॅम इलियट, जॅक फ्रेजर-मॅकगर्क, आरोन हार्डी, मॅकेंजी हार्वे, टॉड मर्फी, तनवीर संघा, लियाम स्कॉट, लॅची शॉ, टॉम स्ट्रॅकर, विल सदरलँड आणि कॅलम विडलर

साप्ताहिक शब्दरुतू - हे पत्र मालक, प्रकाशक सुमती साईनाथ लांडे यांना मुद्रक विजय दत्तात्रय नगरकर यांनी आदित्य प्रिंटर्स, कामगार सदन, क्रॉस मेनरोड, श्रीरामपूर-४१३७०९, जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून शब्दालय प्रकाशन, पोस्ट बॉक्स नं.९०, वार्ड नं.७, आयडीया टॉवरजवळ, श्रीरामपूर ४१३७०९, जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक- सुमती साईनाथ लांडे
Total Code - SR.NO./MAG/11/2021